नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०६/०८/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील सुर्या सुपर कंपनी, एमआयडीसी बोरी येथे दिनांक ०४/०८/२०२२ चे ०४.०० वा. ते दिनांक ०५/०८/२०२२ चे ०७.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे– प्रविन देवराव लाटकर वय ३३ वर्ष, रा. सिडको कॉलनी, बुटीबोरी ता. जि. नागपुर यांचे सुर्या सुपर कंपनीचे गोडावुनचे शटर अज्ञात आरोपीने वाकवुन आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने गोडावुन मधील सुर्या कंपनीचे इलेक्ट्रीक मोटार १८ नग व ३० किलो खुला कॉपर वायर असा एकुण किंमती ७५,०००/–रू. चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार शैलेन्द्र नागरे मो.क्र. ७७४३९१८०५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील टाकळघाट येथे दिनांक ०४/०८/२०२२ चे २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सतीशचंद्र चंद्रीकाप्रसाद मिश्रा वय ५२ वर्ष, रा. पालीवाल ले–आऊट, टाकळघाट यांचा मुलगा घरी एकटाच असतांना तो मोबाईल रिजार्च करण्याकरीता घराचा दार टेकवुन गेला असता अज्ञात आरोपीने खुल्या घरातुन इंडेन कंपनीचा गॅस किं. २,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार प्रमोद बन्सोड क्र. 9673608642 हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ईकोनोमिक्स कंपनी शिवार येथे दिनांक ०५/०८/२०२२ चे ११.३० वा. ते १२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– श्याम अशोक बाली, वय ४१ वर्ष, रा. कामठी ता.जी नागपूर हे ईकोनॉमिक्स कंपनी येथे डयुटीवर हजर असतांना कंपनीच्या मागच्या बाजूला असलेल्या गार्डने वॉकीटॉकी वर माहीती दिली की, काही इसम कंपनीच्या मागच्या तार कंपाउन्ड मधून आत जात आहे. अशा माहितीवरून फिर्यादी आपले गार्ड टिमसह कंपनीच्या मागच्या बाजूला गेले असता तेव्हा तेथे आरोपी क्र. १. अविनाश देवरावजी पंधराम, वय २९ वर्ष, रा. बाजारगाव, २) विजय तुकाराम धुर्वे, वय ३५ वर्ष, रा. बाजारगाव, ३) कैलाश रमेश रामटेके, वय ३५ वर्ष, रा. बाजारगाव, ४) जयप्रकाश गेंदलाल शाहु, वय ३८ वर्ष, रा. गिटीखदान नागपूर ५) फरार आरोपी ऑस्टलीया/दिवाकर गणपतराव परतेती, रा. शिवा यांनी संगणमत करून कंपनीचे खुल्या जागेत ठेवलेले २५ लोखंडी ॲगल गाडी क्र एमएच– ४९/डी– ४८३४ मध्ये टाकतांना दिसले. त्यांचा फिर्यादी आणि त्यांचे टिमने पाठलाग केला असता त्यापैकी चार आरोपी फिर्यादी यांच्या टिमने पकडले व एक आरोपी तेथून पळून गेला. सदर चोरीस गेलेले २५ ॲगल किमंती १५,००००/–रू. व तीन चाकी गाडी किमंती १५,०००/–रू. असा एकुण कि. १,६५,०००/–रू. चा मुद्देमाल तसेच चार आरोपी यांना घेवून सदर फिर्यादी हे पो स्टे. कोंढाळी ला आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ ते ४ यांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार बाबुलाल राठोड हे करीत आहे.

**४) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत १७ पारडगाव शिवार येथे दिनांक ०५/०८/२०२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– गिरीष रविशंकर मडामे (सहाय्यक अभियंता कार्यालय उमेरड), वय ३४ वर्ष यांना वेलसाखरा पारडगाव सर्कल येथील लाईनमैन नामे– किशोर समर्थ यांनी फोन करून सांगीतले की, ‘वेलसाखरा गावा वरून पारडगाव चौकात जाणारी उच्चदाब वाहीनी ११ केव्ही उदासा गावठान फिडर यावरील एकुण १) १२ गाडयाचे ॲल्म्युनियम तार अंदाजे २१६० मिटर कि. ६१,६८९/–रू, २) कापुन नेलेले ३३ केव्ही चे २ लोखंडी पोलाची कि. ४३,१३०/–रू., ३) कापुन नेलेल ११ केव्ही चे ४ लोखंडी पोल कि. ४५,२४०/– रू. असा एकुण कि. १,५०,०५९/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.’

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अजितसिंग ठाकुर मो नं ९४२३६००५५६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**